# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ

कृषि नगर, अकोला - ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

दुरध्वनी : ०७२४-२२५८३७२

कुलसचिव


## परिपत्रक

दि. २६ /१२/२०२२

जा.क्र. साप्रवि/२६ जाने.-२०२३/प्रशस्तीपत्र/३२०१/२०२२

भारतीय प्रजासत्ताक दिनाच्या वर्धापन दिनानिमित्य दिनांक २६ जानेवारी रोजी आयोजित समारंभामध्ये विद्यापीठातील **चतुर्थ श्रेणी कर्मचारी व तांत्रीक कर्मचारी** आपले कर्तव्य व जबाबदारी व्यतिरिक्त कौशल्यपुर्ण, उल्लेखनिय व विद्यापीठ हितार्थ असाधारण काम केल्याबद्दल वा करीत असल्याबद्दल अशांचा गौरव करून त्यांना प्रशस्तीपत्र देवुन सन्मानित करणे गरजेचे असते. तसेच नियम/परिनियमातील तरतुदीनुसार जे कर्मचारी या कसोटिस उतरतात अशा कर्मच्या-यांना त्यानुसार बक्षीस/पारितोषिक यासाठी निवड केल्या जाते. तसेच अशा कर्मचा-यांचा गोपनिय अहवाल उत्कृष्ठ लिहुन त्यांना पदोन्नती वा अतिरिक्त वेतनवाढ इ. देवुन यशोचित सन्मान केल्या जाते.

परंतु जे कर्मचारी वरिल गौरवास पात्र असुनही प्रचलित नियमात तरतुद नसल्यामुळे गुणगौरव होत नाही त्यामुळे असे कर्मचारी यापासुन वंचित राहतात अशा विशेषतः **चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी व तांत्रीक कर्मचारी यांचा** सत्कार करून त्यांचा सन्मान करणे जरूरी असते. तरीपण आपले परिने प्रशंसनिय काम करणाऱ्यांना चांगल्या कर्माचे फळ म्हणुन असा सन्मान मिळावा मुळात ही संकल्पना बाळगुन अशा **चतुर्थ श्रेणीतील कर्मचारी व तांत्रीक कर्मचारी** यांचा गुरुवार, दि. २६ जानेवारी, **२०२३** रोजी प्रजासत्ताक दिनी मा.कुलगुरू यांचे शुभहस्ते सत्कार व प्रशस्तीपत्र देवुन गौरव करावयाचा आहे.

करीता विद्यापीठातील सर्व कार्यालयप्रमुख व नियंत्रण अधिकारी यांना विनंती करण्यात येते की, वरिल परिपत्रकाप्रमाणे आपले अधिनस्त असलेले **चतुर्थ श्रेणी कर्मचारी व तांत्रीक कर्मचारी इमानदारी व कर्तव्यनिष्ठा जोपासतात व आपले कर्तव्य व जबाबदारी व्यतिरिक्त कौशल्यपुर्ण, उल्लेखनिय व विद्यापीठ हितार्थ असाधारण काम करीत असलेले वा केलेले अतुलनिय कामाचे स्वरूप आपले शिफारशीसह मागील पृष्ठावर दिलेल्या प्रपत्रामध्ये भरून** या कार्यालयास **दि.११ जानेवारी, २०२३** पर्यंत प्राप्त होतील अशा बेताने पाठवावेत ही विनंती.**दि.११ जानेवारी २०२३ नंतर उशीरा प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केल्या जाणार नाही याची कृपया नोंद घेण्यात यावी.तसेच नावे पाठवितांना प्रत्येक संवर्गामधुन (असल्यास) फक्त एकाच कर्मचाऱ्याचे नांव पाठविण्यात यावे, एकाच संवर्गामध्ये एकापेक्षा अधिक नावे असल्यास आपल्या स्तरावर फक्त त्यामधील एकाच सर्वोत्कृष्ठ कर्मचाऱ्याचे नांव पाठविण्यात यावे, अधिक नावे पाठविल्यास ती नावे विचारात घेतली जाणार नाहीत.**

**कुलसचिव**
**डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला**

**प्रतिलीपी :**

१) संचालक (सर्व)
२) अधिष्ठाता (सर्व)
३) सहयोगी अधिष्ठाता (सर्व)
४) वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ (सर्व)
५) कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र (सर्व)
७) प्राचार्य, कृषितंत्र विद्यालय (सर्व)
८) प्रभारी अधिकारी (सर्व)
९) प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती प्रणाली कक्ष (ARIS Cell), यांना विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करण्याकरीता.
१०) विभाग प्रमुख / कार्यालय प्रमुख / नियंत्रण अधिकारी (सर्व) **यांना विनंती करण्यात येते की, सदर परिपत्रकान्वये आपले अधिनस्त असलेले फक्त चतुर्थश्रेणी कर्मचारी व तांत्रीक कर्मचारी हे उपरोक्त सन्मानास पात्र अशा कर्मचाऱ्यांचा प्रस्ताव आपले शिफारशीसह विहीत कालावधीत मागील पृष्ठावर दिलेल्या प्रपत्रामध्ये दिलेल्या टिप क्र. १,२,३ नुसारभरून कुलसचिव कार्यालयास त्वरीत सादर करावेत.**
८) विद्यापीठ नियंत्रक / विद्यापीठ अभियंता / विद्यापीठ ग्रंथपाल, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
९) उपकुलसचिव (आस्थापना/साप्रवि/वि.वि), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१०) सहाय्यक कुलसचिव (आस्थापना/साप्रवि/परिक्षा/समिती/प.शि.सं./कृ.म.वि./उ.वि.म./व.वि.म./कृषि अभि.)
११) सहाय्यक नियंत्रक (अंदाजपत्रक/मुख्यालय)/ अधिदान व लेखाधिकारी (अकोला/ नागपूर)
१२) मा. कुलगुरूंचे स्वीय सहायक/ तांत्रिक सचिव/ विशेष कार्यकारी अधिकारी/ जनसंपर्क अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला.
१३) मा. कुलसचिव यांचे स्वीय सहायक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१४) सुरक्षा अधिकारी, सुरक्षा विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला
१५)

***(प्रपत्र मागील पानावर)***

## प्रपत्र

कौशल्यपुर्ण व उल्लेखनिय काम केल्याबद्दल फक्त चतुर्थश्रेणी कर्मचारी व तांत्रीक कर्मचारी यांचा दिनांक २६ जानेवारी, प्रजासत्ताक दिनी विद्यापीठ स्तरावर प्रशस्तीपत्र देवुन सत्कार करण्याकरीता निवड समितीसमोर शिफारस केलेल्यांचा तपशिल

| अ.क्र. | चतुर्थश्रेणी कर्मचारी/तांत्रीक कर्मचारी यांचे संपुर्ण नांव, पदनाम व कार्यालयाचे नांव | कार्यालयाने नेमून दिलेली कामे | आपले कर्तव्य व जबाबदारी व्यतिरिक्त कौशल्यपुर्ण, उल्लेखनिय व विद्यापीठ हितार्थ असाधारण काम करीत असलेले वा केलेले अतुलनिय कामाचे स्वरूप (थोडक्यात) | कार्यालय प्रमुखांचे अभिप्राय | निवड समितीची शिफारस |
|---|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. | ६. |
| | | | | | |

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, वरील कर्मचारी हा फक्तचतुर्थ श्रेणी कर्मचारी/तांत्रीक कर्मचारी असून यापुर्वी यांचा दि.२६ जानेवारी रोजी प्रशस्तीपत्र देवून सत्कार करण्यात आलेला नाही.

कार्यालय प्रमुखांची स्वाक्षरी

टिपः-

१) प्रत्येक संवर्गामधुन (असल्यास) फक्त एकाच कर्मचाऱ्याचे नांव पाठविण्यात यावे, एकाच संवर्गामध्ये एकापेक्षा अधिक नावे असल्यास आपल्या स्तरावर फक्त त्यामधील एकाच सर्वोत्कृष्ठ कर्मचाऱ्याचे नांव पाठविण्यात यावे, अधिक नावे पाठविल्यास ती नावे विचारात घेतली जाणार नाहीत.

२) वरील प्रपत्र ए४ साईज मध्ये आडवेच (landscape), संगणकावर टाईप करून, मराठी भाषेत, चारी बाजुंनी पुरेशी जागा (margin) सोडून, कार्यालय प्रमुखांचे अभिप्राय तथा स्वाक्षरीने भरून पाठवावे.

३) वरील प्रमाणे प्रपत्रामध्ये भरून दिलेली माहिती जशीच्या तशी निवड समितीच्या शिफारशी करीता ठेवण्यात येणार असल्यामुळे प्रत्येक चतुर्थ श्रेणी कर्मचारी/तांत्रीक कर्मचारी यांची माहिती स्वतंत्र पानावर, व्यवस्थीत व थोडक्यात द्यावी अन्यथा माहिती विचारात घेतली जाणार नाही.

कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

Officer In Charge, Agricultural Research Station, Dr. P.D.K.V.
Inward No. 384
Dt.: 26/12/22